# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२९/०३/२०१९
## दि.२८/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे १७४/१९,भादविक ४२०,४६६,४६८,४७१,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-६० वर्षे,रा.गुरुवार पेठ,पुणे |
| **आरोपी** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे एप्रिल ते २०१८ ते आजरोजीपर्यत वेळोवेळी फ्लॅट नं.०७,पहिला मजला,बि.नं.बी-३ सेंन्ट लुक्स को.ऑप.हौ.सोसायटी-१,गुरुवार पेठ,पुणे या ठिकाणी |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी संगनमत करुन,फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन त्यांचे मुलास सावित्रीबाई फुले,पुणे विदयापीठ,पुणे येथे लिपिक पदावर नोकरीस लावतो असे खोटे सांगुन, त्याने आत्तापर्यत अनेक मुलांना नोकरी लावली असल्याचा बहाणा करुन,फिर्यादी यांची दिशाभुल करुन त्यांचेकडुन वेळोवेळी ३,५०,०००/- रुपये चेकद्वारे स्वीकरुन,फिर्यादी यांचे मुलास लिपिक पदावर नियुक्ती झालेबाबतचे बनावट जॉईनिंग लेटर देवुन,सदर इसमाने स्वतःच्या अर्थिक फायदयाकरीता फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. तसेच पोलीसांत तक्रार केल्यास त्याने आत्महत्या करण्याची धमकी दिली. त्याचप्रमाणे फिर्यादी यांची बहिण हिचे मुलीस देखील सदर ठिकाणी नोकरीस लावतो असे सांगुन तीचेकडुन ३,५०,०००/- रुपये वेळोवेळी रोख स्वरुपात घेवुन दोघांची मिळुन एकुण ७ लाख रूपयेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. के.व्हि.पाडोळे ९७६३२९२०३४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे ११५/१९,भादविक ४२०,४६७,४६८,४७१,३४ |
| **फिर्यादी** | एक ज्येष्ठ नागरीक,वय-६७,रा.सिंध सोसा.पुणे |
| **आरोपी** | खाजगी प्रा.लिमी.कंपनीचे मॅनेजींग डायरेक्टर व इतर कंपनीचे डायरेक्टर्स (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०१/२०१८ ते आजतागायत डेक्कन-जीमखाना,प्रभात रोड,पुणे येथील खाजगी बँक, तसेच हिंजेवडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद खाजगी प्रा.लिमी.कंपनीचे मॅनेजींग डायरेक्टर व इतर कंपनीचे डायरेक्टर्स यांनी फिर्यादीस त्यांचे हिंजेवाडी ,मुळशी येथील जमिनीवर कमर्शियल इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी पार्क तयार करणेविषयी सल्ला देवुन,त्यांचा विश्वास संपादन करुन,सदर ठिकाणी क्रेटॉर्स टॉवर बिल्डींगचे बांधकाम करण्यासाठी होकार मिळवुन,सर्व जबाबदारी स्वतःवर घेवुन,फिर्यादी यांना बँकेत मुदत ठेवी ठेवण्यास सांगुन,फिर्यादी यांनी एकुण १४ कोटी ५० लाख मुदत ठेवी ठेवल्या असता,त्यावर सदर इसमांनी क्रेटॉर्स टॉवर उभारणीसाठी एकुण १३ कोटी १ लाख ५० हजार रुपयाचे कर्ज काढुन,ती रक्कम प्रकल्पासाठी न वापरता,त्याचा अपहार करुन, फिर्यादी यांची फसवणुक करुन,त्याने केलेली फसवणुक ही लक्षात येवु नये म्हणुन सदर रक्कम प्रकल्पासाठी खर्च केले असे खोटे बनावट आकडे व फर्मची नावे नमुद करुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.ई.कोळंबीकर ९४०४९०११११ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे १९५/१९,भादविक ४०६,४०८,४२०,४६७,४६८,४६९,४७१,४७५ |
| **फिर्यादी** | एक ज्येष्ठ नागरीक,वय-६२,रा.कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | बाळसाहेब देविदास सोनवणे,वय-४९,रा.पौड रोड,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे जानेवारी २०१५ ते आजपोवेतो के.एफ.आय.सी. सिक्युरीटीज शेअर्स डिलींग कंपनी, स्टर्लिंग सेंटर,कॅम्प,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील नमुद इसम बाळसाहेब देविदास सोनवणे हा के.एफ.आय.सी. सिक्युरीटीज शेअर्स डिलींग कंपनी मध्ये नोकरीस असताना,फिर्यादी यांनी गुंतवणुक केलेले शेअर्स सदर इसमाने परस्पर फिर्यादी यांचा मेल आय.डी. बदलुन,मेन ब्रोकर खांडवाला सिक्युरीटीज लिमी. यांचे बनावट कॉन्ट्रॅक्ट नोटस व बनावट स्टेटस तयार करुन,ते फिर्यादीस देवुन फिर्यादी यांचे शेअर्सची मुळ स्थिती न सांगता,फिर्यादी यांना खोटी माहिती देवुन,शेअर्स गुंतवणुकी मधील एकुण ९०,००,०००/- रुपये शेअर्स स्वतःचे फायदयासाठी त्याचे नावाचे रेलीगर सिक्युरीटीज मध्ये वळवुण,फिर्यादी यांची नमुद रकमेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.आर.काटे ८८८८१२५५६६ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे २७९/१९,भादविक ४१९,१२०(ब),३४ सह ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क. ६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५५,रा चंद्रगुप्त सोसा आनंदनगर |
| **आरोपी** | मोबाईलधारक, बँकेचे खातेधारक व मेलधारक तीन महिला व दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/११/२०१७ ते दि.२०/०२/२०१९ रोजीचे कालावधीत ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद मोबाईलधारक, बँकेचे खातेधारक व मेलधारक तीन महिला व दोन इसम यांनी संगनमत करून,कट रचुन फिर्यादी यांचा इन्शुरन्स व पतीचे डेथ बेनीफीट म्हणुन त्यांना ७० लाखाचा क्लेम पास करुन देतो असे सांगुन,फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन,फिर्यादीस वेळोवेळी एकुण ११,५०,३०८/- रुपये विविध बँक खात्यात भरण्यास सांगुन,त्याची स्वतःची नीट ओळख न सांगता,त्याची खोटी ओळख लपवुन,त्याची खोटी ओळख सांगुन,फिर्यादी यांची नमुद रकमेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. डी.व्हि.पवार ९८२२८३०६६८ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगांव पार्क पो स्टे १४८/१९,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | गिरीष कांबळे,वय-४६ वर्षे,रा.नागपुर चाळ,येरवडा,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०३/२०१९ रोजी २२/४५ वा.ते दि.२३/०३/२०१९ रोजी सकाळी ११/०० वा.चे दरम्यान हवेली प्रांत ऑफिसचे आवारात,क्वीन्स गार्डन,पुणे येथुन |
| **तपशिल** | दि.१८/०३/२०१९ रोजी रात्रौ १०/४५ वा.ससुन हॉस्पीटल येथील सिग्नल येथे मा.उपविभागीय अधिकारी,पुणे शहर हे थांबलेले असताना ट्रक नं.एमएच/४२/टी/११५५ हा अनधिकृतपणे वाळुने भरलेल्या स्थितीत दिसुन आल्याने,त्यांनी त्याबाबत ट्रक चालक याचेकडे नाव,पत्ता व वाळुबाबत विचारणा करता,ट्रक चालकाने ट्रक मध्ये वाळु भरून पुणे येथे येत असल्याचे सांगितले. तसेच वाळु वाहतुकीचा कोणताही परवाना नसल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांनी त्यांचे सहकारी यांना ससुन हॉस्पीटलचे सिग्नलला बोलावुन घेऊन,सदरचा ट्रक हा पंचनामा करून जप्त करून,पुढील कारवाईकरिता मा.उपविभागीय अधिकारी हवेली यांचे कार्यालयाचे आवारात,निलगीरी बंगला,क्वीन्स गार्डन,पुणे येथे रात्रौ २२/४५ वा.आणुन लावला असताना,दि.२३/०३/२०१९ रोजी सकाळी ११/०० वा.चे दरम्यान सदरचा अंदाजे चार ब्रास वाळु असलेला ट्रक २,३०,०००/- रू किंचा वाळुसह फिर्यादी यांचे संमतीशिवाय कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बी.जी.शेंडगे ८८८८९०२९०२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**